## प्रेसनोट

पोलीस उप-आयुक्त,वाहतुक शाखा,पुणे शहर

आदेश क्र.पोउआ/वाहतुक/ ११३५७ /२०१८

पुणे, दिनांक- ३१/१०/२०१८

**विषय :- अति महत्वाचे संरक्षित व्यक्ती यांचे पुणे भेटीच्या अनुषंगाने मगरपट्टा रोडवरील मटेरीयल गेट येथून उजवीकडे अमनोरा कडे वळणेस बंदी असलेला बंदी आदेश काही वेळेकरीता शिथील करणार असले बाबत.**

दिनांक- ०१/११/२०१८ रोजी, अति महत्वाचे संरक्षित व्यक्ती यांचा लक्ष्मी लॉन्स मगरपट्टा सिटी हडपसर पुणे या ठिकाणी कार्यक्रम असून सदर ठिकाणी परतीचे मार्गाचे अनुषंगाने अति महत्वाचे व्यक्तींचे सुरक्षिततेच्या कारणास्तव सिझन मॉल मटेरीयल गेट येथून उजवीकडे वळून अमेनोरा मार्गे मगरपट्टा जंक्शन या मार्गावर आदेश क्रमांक पोउआ /वाहतुक /६१/२०१८ पुणे दिनांक- २७/०७/२०१८ रोजीचे बंदी आदेश दौ-या दरम्यान शिथील करणे आवश्यक असल्याने तसेच तेथील परीसरातील नागरीकांची गैरसोय तसेच वाहतूकीची कोंडी टाळणेसाठी सदर ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, प्रभाकर ढमाले,सहा.पोलीस आयुक्त,परिमंडळ-१, अतिरिक्त कार्यभार,पोलीस उप आयुक्त,वाहतुक पुणे शहर, दिनांक ०१/११/२०१८ रोजी अति महत्वाचे व्यक्तींचे दौ-या दरम्यान वाहतुकीचे बदला बाबत खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

---

मगरपट्टा रोडवरील मटेरीयल गेट सिझन मॉल समोरील टी पॉईंटवर वाहनांना मगरपट्टयाकडून उजवीकडे वळून मुंढव्याकडे जाणारा रोड क्रॉस करुन अमेनोरा जंक्शनकडे येण्यास बंदी असलेला मार्ग बाबत आदेश क्रमांक पोउआ /वाहतुक /६१/२०१८ पुणे दिनांक- २७/०७/२०१८ रोजीचे बंदी आदेश दौ-या दरम्यान शिथील करण्यात येत आहे. अति महत्वाची व्यक्ती ह्या सदर कार्यक्रमाचे ठिकाणाहून मार्गस्थ झाल्यावर सदरचा आदेश परत लागू राहील.

( पान... )

Scanned by CamScanner